International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.6 No.3 Jan – Feb 2019

# कोल्हापूर जिल्ह्यातील छ. शाहू महाराजांच्या काळातील दलित कार्यकर्ते

**डॉ.गौतम हरी आळतेकर**

**सहयोगी प्राध्यापक, श्री शिव–शाहू महाविद्यालय,**

**सरूड, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**

२० व २१ मार्च १९२० रोजी कोल्हापूर संस्थानातील 'माणगाव' या गावी दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन भरविण्यात आले होते. या परिषदेमध्ये मुख्य आकर्षणडॉ. आंबेडकर होते. या परिषदेनंतर कोल्हापूर संस्थानातील दलित पुढाऱ्यांच्यामध्ये शाहू महाराजांच्या व डॉ. आंबेडकरांच्या मुळेमोठा आत्मविश्वास निर्माण झाला. अर्थात १९०२ पासून शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानमध्ये जे दलितांच्या उद्धारासाठी निर्णय घेतले होते. तेव्हापासून दलित पुढाऱ्यांच्यामध्ये मोठा आत्मविश्वास संचारला होता. पण याला जी खरी गती आली ती म्हणजे माणगांवच्या परिषदेने. या परिषदेमध्ये प्रथम याच समाजातील उच्चविद्याविभूषित डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या प्रश्नांविषयी जी चर्चा केली तेव्हा पासून कोल्हापूर संस्थानातील व बाहेरच्या दलित पुढाऱ्यांच्यामध्ये एक नवा आत्मविश्वास संचारला. आधुनिक काळामध्ये कोल्हापूर संस्थानात राजर्षि शाहू महाराज व त्यांचे चिरंजीव राजाराम महाराज यांनी दलितांच्या उद्धारासाठी जे न भूतो व न भविष्यती असे निर्णय घेतले व ते तमाम दलितांचे पालक झालेत. त्यामुळे त्यांच्या काळात कोल्हापूर संस्थानांमध्ये अनेक दलित पुढाऱ्यांचा उदय झाला व ते आपल्या समाजाला माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी संघर्षाला तयार झाले. या पुढाऱ्यांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये सभा, परिषदा, संमेलने घेवून शाहू महाराज, राजाराम महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या मदतीने दलितांची चळवळ उभारली तिची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे

**कोल्हापूर संस्थानातील दलित चळवळ व दलित नेते:**

**१. गंगाराम यमाजी कांबळे (१८६७-१९५२):**

छत्रपती राजर्षि शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर सामाजिक चळवळ करणारा कार्यकर्ता म्हणजे गंगाराम यमाजी कांबळे. शाहू महाराजांचा यांच्यावर मोठा विश्वास होता. यांचा जन्म इ. स. १८६७ मध्ये कोल्हापूरात झाला. त्यांच्या पत्नीचे नाव रखमाबाई होते. यांचे गांव चोकाक, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर होते. गंगाराम कांबळेंचे शिक्षण फार झाले नव्हते. पण त्यांना लिहिता-वाचता येत होते. याच जोरावर गंगारामकांबळे शाहूंच्या सेवेमध्ये घोड्यांची निगा करण्यासाठी मोतद्दाराचे काम सुरू केले. उन्हाळ्याचे दिवस होते. दुपारची वेळ होती. इतर मंडळी प्रमाणेच गंगारामलाही भूक लागली होती.

पण पाण्यामुळे तो भाकरी खाऊ शकत नव्हता. त्याने धाडसाने पाण्याच्या हौदावर जावून बादली भरली व त्याने तहान भागविली. हे स्पृश्य कामगारांना सहन झाले नाही. त्यांनी याचा जाब गंगारामला विचारला व त्याची पाठ फोडून काढली.

यावेळी शाहू महाराज दिल्लीला गेले होते. दिल्लीवरून येताच गंगाराम कांबळेंनी शाहू महाराजांना सर्व प्रकार सांगितला व आपली पाठ दाखविली. शाहू महाराजांनी गंगारामची पाठ पाहताच त्यांचे अंत:करण द्रवले. शाहू महाराजांनी सर्व मारेकऱ्यांना बोलावून हंटरने मारून त्यांना शिक्षा केली व गंगारामला दरबारची नोकरी सोडून व्यवसाय करायला सांगितले. एवढेच नाही स्वत:हून त्याला मदत केली. यानंतर महाराजांनी फर्मान काढून संस्थानातील सरकारी अगर सार्वजनिक विहीर तलाव आणि नदीचे पाणवटे सर्वांना खुले केले. पुन्हा अमानवीय घटना घडल्या तर तो एक दंडनिय गुन्हा समजला जाईल असे जाहीर केले.

महाराजांच्या सेवेतून मुक्त झाल्यानंतर गंगाराम कांबळेनी महाराजांच्याच मदतीने टॉऊन हॉलच्या जवळ भाऊसिंगची रोडवर सत्यसुधारक हॉटेल सुरू केले. या हॉटेलमध्ये शाहू महाराज रोज चहा घेत असत व आपल्या सोबत असणाऱ्या इतर अधिकाऱ्यांनाही देत असत. या अधिकाऱ्यांमध्ये मराठा, ब्राह्मण व मुसलमान असत. सत्य प्रसारक मंडळाची स्थापना १९२०-२१

गंगाराम कांबळेवर चोरीचा सुद्धा आळ घेतला होता. यामध्ये राजवाड्यातील काही उच्चजातीची मंडळी सामील होती. पण चौकशी अंती गंगाराम कांबळे निर्दोष झाले. याबाबत शाहू महाराजांकडे तक्रार केली होती. अशा प्रकारे गंगाराम कांबळे म्हणजे अन्यायातून पेटून उभे राहिलेले दलित समाजाचे कार्यकर्ते होते. गंगाराम कांबळेंचे कार्य पाहून अनेक दलित समाजाच्या कार्यकर्त्यांनी समाजाच्या कार्यासाठी स्वत:ला झोकून दिले. यापैकी यल्लाप्पा नाईक बेडकिहाळकर एक होते. यल्लाप्पा महाराजांकडे ड्रायव्हर म्हणून काम करत होता. यल्लाप्पाने गंगाराम कांबळे व सहकाऱ्यांकडे एक नवीन योजना ठेवली ती म्हणजे दलित समाजाच्या कल्याणासाठी आपण एखादी संस्था निर्माण करू ही कल्पना सर्वांनी उचलून धरली. अर्थातच यासाठी महाराजांचा आशिर्वाद व आर्थिक मदत हवी होती.

गंगाराम कांबळे व मंडळीनी ही कल्पना महाराजांच्या समोर मांडण्यासाठी सोनतळीला गेले. महाराजांना संस्था स्थापण्याची कल्पना सांगितली. या वेळी बरीच चर्चा होवून याला महाराजांनी हिरवा कंदील दाखविला. संस्थेला नाव ही सुचविले दक्षिण महाराष्ट्र सत्यप्रसारक मंडळ तसेच या संस्थेला जुन्या पोस्टाच्या पिछाडीची जागांही दिली. या संस्थेचे अध्यक्ष गंगाराम कांबळे होते. तर उपाध्यक्ष बाबुराव रामचंद्र कांबळे होते.

दक्षिण महाराष्ट्र बहिष्कृत लोकांची पहिली परिषद मार्च १९२० मध्ये माणगाव येथे पार पडली होती. या वेळी गंगाराम कांबळेंनी मोलाची मदत केली होती. छत्रपती शाहूंच्या मृत्यूनंतर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे व गंगाराम कांबळे सहभागी होते.

अशा पद्धतीने गंगाराम कांबळेंनी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांच्या मदतीने आपले कार्य सुरूच ठेवले. अशा या समाज सेवकांचा मृत्यू ७-२-१९५२ ला झाला. पुढे यांचा स्मृतीस्तंभ कोल्हापूरातील टाऊन हॉल शेजारी उभारला त्याचे उद्घाटन डॉ. बाबा आढाव यांनी केले.

**२. दत्ताबो संतराम पोवार (१८८७-१९७२) -**

दत्तोब पोवार यांचा जन्म १८८७ ला चर्मकार कुटूंबात झाला. हे कोल्हापूरचे होते. डॉ. आंबेडकर व शाहू महाराज यांची भेट यांनीच घडवून आणली. या भेटीतून डॉ. आंबेडकर व शाहू महाराज यांची मैत्री झाली. या बरोबरच डॉ. आंबेडकर दत्तोबा पोवार यांचीही मैत्री दृढ होत गेली.

२० मार्च १९२० च्या माणगाव परिषदेमध्ये दत्तोबा पोवार यांचा सक्रिय सहभाग होता. डॉ. आंबेडकरांना दत्तोबा पोवार नेहमीच आर्थिक मदत करत होते. डॉ. आंबेडकर व दत्तोबा पोवार यांची एवढी घनिष्ठ मैत्री होती की डॉ. आंबेडकरांनी जी पत्रे पाठविली आहेत. त्याची सुरुवात My Dear Dattoba अशी केलेली दिसते. डॉ. आंबेडकरांना सतत आर्थिक मदत मिळावी म्हणून दत्तोबा पवार आपल्या दुकानाची जाहिरात 'मुकनायक' व 'बहिष्कृत भारत' या अंकात देत असत. त्यांच्या दुकानाचे नाव 'लोकमान्य जोडे व पैजारा' असे होते. तर याचा पत्ता फेरीस मार्केट, कोल्हापूर सिटी असा होता. तर त्यांचे घर शिवाजीपेठेमध्ये होते. या घरामध्ये डॉ. आंबेडकर वास्तव्यालासुद्धा होते. दत्तोबा पोवार डॉ. बाबासाहेबांच्या मदतीने अनेक दलित चळवळीमध्ये सक्रिय होते. तसेच तन, मन व धनाने ते स्वत:ला झोकून देत होते. हा सर्व विचार करून शाहू महाराजांनी दत्तोबा पोवारांना वकिलीची सनद व 'म्युनिसिपालीटीचे चेअरमन' पद देवून त्यांचा योग्य तो सत्कारच केला. दत्तोबा पोवार शाहू महाराजांच्या व राजाराम महाराजांच्या काळात दरबारात नोकरी करुन दलितांच्यामध्ये सामाजिक प्रबोधन करीत होते तर डॉ. आंबेडकर हे त्यांच्या जिवाभावाचे मित्र होते.

पुढे दत्तोबा पोवार हे काँग्रेसमध्ये गेले आणि आमदारही झाले. त्यांचे निधन २१ मे १९७२ ला झाले.

**३. तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य (१८९६-१९५१) -**

कोल्हापूर संस्थानातील एक महत्वाचे दलित कार्यकर्ते म्हणजे टी. ए. गणेशाचार्य होय. त्यांचे मुळगाव कोडोली, ता. करवीरचे होते. ते मातंग जातीचे होते. शाहू महाराजांनी दलितांच्यासाठी शिक्षणाची

दारे खुली केली. याचा फायदा गणेशाचार्यांनी घेवून ते मॅट्रीक पास झाले. शाहू महाराजांनी त्यांची बुद्धीमत्ता पाहून त्यांना वकिलीची सनद दिली.

१९२० माणगाव परिषदेमध्ये गणेशाचार्य वकिलांचा सक्रिय सहभाग होता. या घटनेनंतर गणेशाचार्यांचा व डॉ. बाबासाहेबांचा घनिष्ट संबंध आला. डॉ. बाबासाहेब बॅरिस्टर झालेनंतर वकिलीच्याबाबत डॉ. आंबेडकरांच्या नावाचा बोर्ड आपल्या घरावर प्रथम गणेशाचार्य वकिलांनीच लावला. गणेशाचार्य वकिलांनी डॉ. आंबेडकरांनी प्रज्वलीत केलेली क्रांतीची ज्योत सतत तेवत ठेवली. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी 'दलित चळवळ' नेटाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. या मध्ये गणेशाचार्य वकिलांचा वाटा महत्वाचा आहे.

काही काळ गणेशाचार्य हे १९२७ ला 'मिल क्लार्क' बोडींगचे सुपरिटेंडंट होते. तसेच कोल्हापूर नगर पालिकेचे सदस्यही होते. या शिवाय इंदूमती बोर्डिंगचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

डॉ. आंबेडकर कोल्हापूरला आले की गणेशाचार्य हे नेहमीच डॉ. आंबेडकरांच्या बरोबर असायचे. शेवटच्या काळात ते आजारी पडल्याने त्यांनी मिरजेच्या दवाखान्यात अॅडमिट केले. यावेळी डॉ. आंबेडकरांनी दवाखान्यात जावून त्यांची विचारपूस केली. दि. १७ जानेवारी १९५१ ला त्यांचे निधन झाले.

**४. गंगाधर यशवंत पोळ (१९०० ते १९८५) -**

शाहू महाराजांच्या काळातील दलितांचे एक महत्वाचे कार्यकर्ते म्हणजे गंगाधर यशवंत पोळ यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातीलचिक्कोडी येथे २८-०४-१९०० ला ढोर समाजात झाला. गंगाधर पोळांचे गाव यावेळी कोल्हापूर संस्थानमध्ये मोडत होते. गंगाधर हे ढोर समाजातील पहिले मॅट्रीक होणारे होय. पुढे त्यांनी कॉलेजला प्रवेश घेतला. कोल्हापूर संस्थान व महाराष्ट्र राज्याचा Deputy Education Inspector म्हणून काम केले. १९५५ पर्यंत त्यांनीनोकरी केली व नोकरी करत असतानाच म. फुले, शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने त्यांनी समाजकार्यास सुरुवात केली.

१९१९ मध्ये गंगाधर यशवंत पोळ हे कोल्हापूर संस्थानमध्ये तलाठी म्हणून काम पहात होते. पुढे जेव्हा माणगाव परिषद झाली तेव्हा ते दत्तोबा पोवारांबरोबर सक्रिय सहभागी झाले. जेव्हा परिषदेसाठी डॉ. आंबेडकर कोल्हापूरात आले तेव्हा डॉ. आंबेडकरांचे रेल्वे स्टेशनवर दत्तोबा पोवार बरोबर गंगाधर पोळ यांनी सुद्धा हार घालून स्वागत केले. या घटनेपासून डॉ. आंबेडकर व गंगाधर पोळ यांच्यात स्नेह निर्माण झाले.

माणगाव परिषदेतील डॉ. आंबेडकरांचे ऐतिहासिक भाषण ऐकून गंगाधरांना प्रेरणा मिळाली व ते डॉ. रमाकांत कांबळे, तुकाराम गणाचारी, गंगाराम कांबळे इत्यादी दलित पुढाऱ्या बरोबर काम करू लागले. तसेच कोल्हापूरच्या बाहेरील ढोर व चांभार समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी 'इंदूमती राणी वसतीगृह'

सुरू केले व समाज कार्यात स्वत:ला झोकून दिले. यातूनच त्यांनी गारगोटीला गरीब अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी ७ फेब्रुवारी १९३८ ला एक वसतीगृह सुरू केले.

गंगाधर पोळवर डॉ. आंबेडकरांचा एवढा विश्वास बसला की, राजाराम महाराजांच्या कडून पन्हाळयामध्ये बाबासाहेबांना दोन एकराचा जो प्लॉट दिला गेला होतो 'वटमुक्त्यार द्वारे' गंगाधर पोळनी पन्हाळा तहसिलदाराकडून ताब्यात घेवून हद्दी मापून घेतल्या. डॉ. आंबेडकर व गंगाधर पोळ यांचा पत्रव्यवहार होत होता. पुढे नोकरीतून सेवामुक्त झाल्यानंतर ते १९५५ ला काँग्रेसचे सभासद झाले. तसेच समाजाची सेवाही सुरु ठेवली. १९८५ ला त्यांचे निधन झाले.

**५. मारुती तातोबा मोरे (मा. ता. मोरे १९१३-१९९१) -**

मातंग समाजातील शाहू महाराजांच्या काळातील आणखीन एक दलित कार्यकर्ते म्हणजे मा. ता. मोरे होय. यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील भिलवडी येथे १३ मार्च १९१३ ला झाला. मा. ता. मोरे यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर अशा दोन्ही कालखंडामध्ये सामाजिक कार्य केले. शाहू मिल जवळच्या मातंग वसाहतीमध्ये राहून मा. ता. नी दलित समाजासाठीअहोरात्र काम केले. करवीर इलाका, हरिजन सेवक संघ, म्युनिसिपल कामगार संघ, मिस क्लार्क हॉस्टेल, हरिजन कन्या छात्रालय या संस्थांच्या माध्यमातून तर ‘महाद्वार' व 'माणगाव परिषद विशेष अंक' यांच्या माध्यमातून लेख लिहून दलित समाजाचे प्रबोधन केले.

मा. ता. मोरे हे मातंग समाजला भूषण होते. ते आंबेडकरवादीव बुद्धीस्ट होते. अशा या दलित कार्यकर्त्यांचे निधन २ जून १९९१ ला झाले.

**६. आबा सुबु गवळी -**

आबा गवळी यांचा जन्म माणगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे १९०३ ला झाला. आबा गवळी हे म. फुले. शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या विचाराचे होते. माणगाव परिषदेनंतर आबा गवळीचे डॉ. आंबेडकर प्रेरणास्थान झाले. यानंतर समाजासाठी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत या माध्यमातून सेवा केली. यामुळे त्यांची मुलेहीआंबेडकरी चळवळीमध्ये सक्रिय झाली.

**७. पंजाबराव ईश्वरा हलस्वार (१८७४ ते १९४४) -**

पंजाबरावांचा जन्म कोल्हापूरातलाच. ते शाहू महाराजांचे समकालीन होते. शाहू महाराजांनी आपल्या समवयस्क लोकांना एकत्र करून सत्यशोधक विचाराचा प्रथम प्रसार केला. यामध्ये पंजाबराव सक्रिय होते. ते चौथीपर्यंत शिकले होते. १९२० च्या माणगाव परिषदेमध्येही त्यांचा वाटा महत्वाचा होता.

मिस क्लार्क बोर्डिंगच्या समोरच त्यांचे घर होते. या बोर्डिंगच्या स्थापनेमध्येसुद्धा त्यांचा वाटा महत्वाचा होता. ते काही काळ मिस क्लार्क बोर्डिंगचे सुपरिटेंडंटही होते.

शाहू महाराजांच्या अकाली निधनामुळे त्यांना मोठा धक्का बसला. त्यांनी शाहू महाराजांना दोन कविता लिहून श्रद्धांजली अर्पण केली. मिस क्लार्क बोर्डिंगमुळे दलित मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. परंतु मुलींचे काय? यांसाठी त्यांनी प्रयत्न केले.

पंजाबराव हे महाराष्ट्र समतावादी मंडळ, करवीर इलाखा बहिस्कृत परिषद, दक्षिण महाराष्ट्र सत्य प्रसारक मंडळ, दलित प्रजामंडळच्या माध्यमातून पंजाबराव दलित चळवळ सांभाळत होते. पुढे सर्वांच्या सहकार्याने पंजाबरावांनी डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या दलित फेडरेशनची शाखा कोल्हापूरात स्थापन करून फुले-शाहू-आंबेडकरी विचाराचा ते प्रसार करू लागले. त्यांना शाहू महाराजांनी दानवाड ता. शिरोळ येथे जमिन दिली. अशा या दलित कार्यकर्त्यांचे निधन दि. ६-११-१९४४ रोजी झाले.

**८. गणपत बापूजी पोवार (१८८४-१९७४)**

कोल्हापूर संस्थानातील एक महत्वाचे दलित पुढारी म्हणजे गणपत पोवार होय. यांचे मूळ गाव पन्हाळा तालुक्यातील माजनाळ होय. त्यांचे वडील बापूजी पोवार हे नोकरी निमित्ताने कोल्हापूरला आले. कोल्हापूरातच गणपत पवार मोठे झाले. ८ नोव्हेंबर १९१९ ला शाहू महाराजांनी एक आदेश काढून सार्वजनिक ठिकाणी जातीभेद करण्यास मनाई केली. यावेळी सिद्धार्थ नगर मधील गंगाराम कांबळे, म. सु. लिगाडे व इतरांच्या बरोबर, गणपतपोवार महानगरपालिकेच्या जवळील सार्वजनिक नळावर पाणी भरणेसाठी गेले, तेव्हा तेथे त्यांना सर्वांच्याकडून विरोध होऊनबरीच मारहाण झाली. त्यावेळी शेजारील चर्च मधील 'बेकर' यांनी त्यांना संरक्षण दिले. शाहू महाराजांनी या जखमी मुलांना सोनतळी क□पवर नेवून औषधोपचार केला. पुढे आरोपीना अटकही केली. या जखमी मुलांच्यामध्ये गणपत पोवार आघाडीवर होते.

पुढे शाहू महाराजांनी गणपत पोवारांना शिलाईचे दुकान काढून दिले. १९३४ ला डॉ. आंबेडकरांनी या दुकानाला भेट दिली. यावेळी गणपत पोवार व आंबेडकर यांचे संबंध जास्तच जवळचे निर्माण झाले. पुढे ते कोल्हापूर नरगपालिकेचे सभासदही झाले. वार्धक्याने गणपत पोवारांचे निधन २८-०२-१८७४ ला झाले.

**९. ज्ञानदेव भिकाजी खोचीकर (१९०६-१९९१) -**

ज्ञानदेव खोचीकर यांचा जन्म खोची ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे १९०६ ला झाला. माणगाव परिषदेला ते वयाच्या १५-१६ व्या वर्षी गावातल्या मोठ्या माणसांच्या बरोबर हजर होते. माणगाव परिषदेनंतर ते आंबेडकरांचे भाषण ऐकण्यासाठी कवठे पिरान व रहिमतपुरला चालत गेले. कवठे

पिरान येथे सत्याग्रह करून त्यांनी तेथील सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानदेव खोचीकर पुढे मुंबईला गेले व तेथेआंबेडेकरांच्या सहवासात व चळवळीत सक्रिय झाले. पुढे मजूर पक्षात, दलित फेडरेशनमध्ये व ब्लॉक अध्यक्ष म्हणून ते सतत चळवळीत राहिले. एकंदरीत खोचीकर खेड्यात राहून सुद्धा आंबेडकरी चळवळीत ओढले गेले व आयुष्यभर फुले-शाहूआंबेडकर-राजाराम महाराज यांचे विचार समाजात पसरविण्यासाठी झगडले. त्यांचा मृत्यू ७ जुलै १९९१ ला झाला.

**१०. दलितमित्र मा. ई. कुरणे (१९२२-१९८९) -**

माधवराव ईश्वरा कुरणे यांचा जन्म हेरले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे २ जानेवारी १९२२ ला झाला. त्यांचे शिक्षण मट्रिक पर्यंत झाले होते. विद्यार्थी दशेत असतानाच ते दलित चळवळीकडे ओढले गेले. मा. ई. कुरणेंनी शुगरमिलमध्ये नोकरीधरली. पुढे नोकरी करत करत त्यांनी चळवळ जिवंत ठेवली. या काळात त्यांनी कामगार युनियनचेही काम केले. १९४५ ला दादासाहेब शिर्केच्यामुळे त्यांचा आंबेडकरांशी संपर्क आला. डॉ. आंबेडकरांच्या आदेशाने मा. ई. कुरणे ६५ सदस्यांसह पुणे सत्याग्रहात सामिल झाले. त्यांनी जिल्हा लोकल बोर्ड, जि. प. स्विकृत सदस्य म्हणून काम पाहिले. या बरोबरच दलितांना निवारा मिळावा म्हणून त्यांनी कोल्हापूरमध्ये हौसिंग सोसायटीची स्थापना केली. पुढे ते जिल्हा मध्यवर्ती बँकेत सदस्य म्हणून गेले तेव्हा त्यांनी दलितांना बँकेकडून मदत मिळवून दिली. मा. ई. कुरणे यांनी आर. पी. आयच्या माध्यमातून आमदारकीची निवडणुकही लढविली होती. त्यांचा सर्व पक्षीय सत्कार २ जानेवारी १९८९ ला झाला व त्यांचे निधन १५ ऑक्टोबर १९८९ ला झाले.

**११. दादासाहेब मल्हारराव शिर्के (१९०७-१९८५) -**

दादासाहेबांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील नागाव या गावी १९०७ ला महार जातीत झाला. त्यांचे वडिल शाहू महाराजांच्या दरबारांमध्ये हुलस्वार म्हणून काम पहात होते. दादासाहेबांचे शिक्षण कोल्हापूरातच झाले. दादासाहेबांची व डॉ. आंबेडकरांची भेट दादासाहेब १४,१५ वयाचे असतानाच कोल्हापूर मध्ये झाली. अवघ्या १९ व्या वर्षी त्यांनी 'गरुड' नावाचे साप्ताहिक सुरू केले व फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराचा प्रचार व प्रसार करू लागले. माणगाव परिषद, कोल्हापूर संस्था, दलित प्रजा परिषद, अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि आमदारकीच्या माध्यमातून दादासाहेबानी दलितांच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे ते आमदार असताना डॉ. आंबेडकर जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडून मंजूर करून घेतली. अशा या कार्यकत्याचे २६ डिसेंबर १९८५ रोजी कोल्हापूरातील सिद्धार्थनगगर येथे राहत्या घरी निधन झाले.

**१२. विठाबाई माधवराव काळे -**

फुले-शाहू आंबेडकर यांचा आदर्श डोळयापुढे ठेवून विठाबाई काळे यांनी कोल्हापूरात सामाजिक कार्यास सुरुवात केली. अन्याय व अत्याचाराविरुद्ध आंदोलनामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. ब□ सावरकरांची १९३७ ला कोल्हापुरातील सिद्धार्थनगरध्ये सभा होती. यामध्ये विठाबाईचा सक्रिय भाग होता. डॉ. आंबेडकर व साने गुरुजी यांनी विठाबाईच्या घरी भोजन केले. विठाबाईचा सिमा प्रश्नी आंदोलनामध्येही सक्रिय सहभाग होता. आर. पी. आय. नेत्या म्हणूनही त्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध होत्या. २७ जानेवारी १९९६ ला त्यांचे निधन झाले.

**सारांश -**

वेदोक्त प्रकरणानंतर सत्यशोधक समाजाच्या विचारानुसार शाहू महाराजांनी आपल्या क्रांतीकारक निर्णयांनी जातीभेदाला व वर्णव्यवस्थेला. धक्का दिला. त्यांनी आपल्या संस्थामध्ये ब्राह्मणेत्तरांसाठी ५०% राखीव जागा ठेवल्या. तसेच वेगवेगळ्या जातीच्या विद्यार्थ्यासाठी बोर्डिंग सुरु केली. या शाहू महाराजांच्या क्रांतीकारक निर्णयामुळे कोल्हापुरातील दलितांच्यामध्ये जागृती होऊन काही मंडळी शिकू लागली. तर काहीजण दरबारामध्ये वेगवेगळ्या विभागात नोकरी करू लागले. शाहू महाराजांनी दलितांच्यासाठी अनेक निर्णय घेतले. पण या समाजातील नेतृत्व पुढे आले पाहिजे असे त्यांना वाटत होते. १९२० च्या माणगाव परिषदेनंतर कोल्हापुरात दलित तरुणांच्या मध्ये जागृती होऊन शाहू महाराजांच्या व डॉ. आंबेडकरांच्या आणि पुढे राजाराम महाराजांच्या मदतीने ही मंडळी समाजकार्य करू लागली. पुढे महाराष्ट्रामध्ये कोल्हापूरच्या वरील कार्यकर्त्यांचा आदर्श घेऊन चळवळी सुरु झाल्या. कोल्हापूर संस्थान हे या वेळी सामाजिक सुधारणेच्या बाबतीत अग्रेसर होते. या मुळे या संस्थानातील दलित कार्यकर्तेही हळूहळू पुढे आले. यामध्ये गंगाराम कांबळे, दत्तोबा पवार, दादासाहेब शिर्के, गणेशाचार्य वकील, गंगाराम पोळ, मा. ता. मोरे, आबा गवळी, पंजाबराव हुलस्वार, गणपत पोवार, ज्ञानदेव खोचीकर, मा. ई. कुरणे, विठाबाई काळे यांचा समावेश होता. या मंडळीनी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या प्रेरणेने ब्राह्मणेवादास तोफ डागण्यास सुरवात केली व माणसालामाणसाप्रमाणे वागण्यासाठी कोल्हापूरात व महाराष्ट्रामध्ये संघर्षकेला. आज महाराष्ट्रांमध्ये दलितांना राजकीय व सामाजिक चळवळीमध्ये जे महत्व मिळत आहे त्याचे संपूर्ण श्रेयं हे कोल्हापूरचेछत्रपती राजर्षि शाहू महाराज, डॉ. आंबेडकर व राजाराम महाराजांच्या काळातील दलित नेत्यांच्या विचाराकडे व कार्याकडे जाते.

**संदर्भ -**

१. डॉ. पवार जयसिंगराव (संपादक) - राजर्षी शाहू स्मारकग्रंथ, प्रकाशक-महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीयआवृत्ती २६ जून २००७ .

२. साळुखे पी. बी. (संपादक) - राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,प्रकाशक- शिक्षण व सेवा योजन विभाग, महाराष्ट्र राज्यमुंबई, द्वितीय आवृत्ती मार्च १९८८

३. बागल माधवराव - राजर्षि छत्रपती श्री शाहू यांच्या आठवणी,प्रकाशक-माधवराव बागल १९५०

४. किर धनंजय – शाहू छत्रपती एक क्रांतीकारक राजा (१९७६)

५. कुरणे सी. पी. - अप्रकाशित पी. एच्डी प्रबंध, कोल्हापूरसंस्थान आणि कोल्हापूर जिल्ह्यातील दलित चळवळ, इ. स. १९४ ते १९७०, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर२०१०

६. पोवार सुधीर - राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर आणिकोल्हापुरची दलित चळवळ, प्रकाशक-दलित मित्र जी. एम. पंडित, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००२